सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

## डॉ. पी. सी. अलेक्झांडर

यांचे

# अभिभाषण

भारताच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे
मुंबई येथील विशेष संयुक्त अधिवेशन

---

शुक्रवार, १५ ऑगस्ट १९९७

सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्य,

आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी आनंदसोहळ्याच्या प्रसंगी मी आपले आणि आपल्यामार्फत महाराष्ट्रातील जनतेचे हार्दिक अभिनंदन आणि अभीष्टचिंतन करत आहे. एक स्वतंत्र आणि लोकशाही राष्ट्र म्हणून आपण केलेल्या प्रगतीच्या वाटचालीतील अर्धशतक पूर्तीच्या शुभदिनी, महाराष्ट्राच्या जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आपल्यासारख्या मान्यवरांबरोबर आनंदात सहभागी होण्याची संधी मला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो.

हजारो वर्षांच्या आपल्या प्राचीन संस्कृतीच्या इतिहासाच्या तुलनेत पन्नास वर्षे म्हणजे केवळ बिंदुमात्र आहेत. परंतु, हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा आहे याचे कारण आपल्या मायभूमीवरील अधिकार आपण परत मिळवल्यानंतरचे हे पहिले अर्धशतक आहे. आपले थोर नेते जवाहरलाल नेहरु यांनी बरोबर पन्नास वर्षांपूर्वी मध्यरात्री १२ वाजता उद्‌गार काढले होते की, '' **एक क्षण असा येतो, जेव्हा आपण भूतकाळातून वर्तमानात प्रवेश करतो, जेव्हा एका युगाचा अंत होतो आणि जेव्हा प्रदीर्घ काळापर्यंत घुसमटलेला राष्ट्राचा आत्मा मुक्ततेचा हुंकार देतो, इतिहासात असा क्षण क्वचितच येतो.** '' या महनीय सभागृहात हजर असलेल्या आपल्यापैकी अनेकांना ५० वर्षांपूर्वी १५ ऑगस्ट रोजी '' जुन्या युगातून नव्या युगात पदार्पण '' करतानाच्या उत्कट भावनांचा व अत्यानंदाचा रोमहर्षक अनुभव स्मरत असेल. महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या या संयुक्त अधिवेशनात तो क्षण पुन्हा एकदा अनुभवताना या घटनेच्या ऐतिहासिक महत्त्वामुळे मी खरोखरच भारावून गेलो आहे.

ज्या महात्मा गांधींनी वसाहतवाद्यांच्या पाशवी जुलूमजबरदस्तीला सत्य आणि अहिंसेच्या अजेय अशा शस्त्राने आव्हान दिले आणि त्या काळापर्यंत अखिल जगात बलाढ्य ठरलेल्या शक्तीला भारतभूमीमधून माघार घ्यायला लावली त्या महात्मा गांधींच्या तेजस्वी स्मृतीपुढे आपण आदराने नतमस्तक होऊया. पन्नास वर्षांपूर्वी याच दिवशी जेव्हा सारे राष्ट्र स्वातंत्र्याच्या अरुणोदयाचे स्वागत करण्यासाठी ध्वजापताका फडकवून, फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा करत होते, विजयसभा घेत होते, मिरवणुका काढत होते, तेव्हा हा व्यथित महामानव सर्व समारंभाचा गोंधळ व गोंगाट यांपासून दूर, बंगालच्या गलिच्छ रस्त्यांवर, चिखलाने भरलेल्या गल्ल्यांमधून फिरत होता, लोकांना सुजाणपणा, प्रेम आणि मैत्रीचा मार्ग स्वीकारण्याबद्दल विनवीत होता. परिणामी, आपल्या मतांचे ठामपणे प्रतिपादन केल्याबद्दल त्यांना आपल्या प्राणांचे मोल द्यावे लागले. मात्र, सत्य व अहिंसा या तत्त्वांच्या कसोटीस पुरेपूर उतरणारा गांधीजींखेरीज इतर कोणीही मानव आधुनिक काळात जन्माला आला नाही याची साक्ष इतिहासच देईल. अशा थोर पुरुषाला राष्ट्रपिता म्हणून अभिवादन करताना धन्यता वाटते.

जवाहरलाल नेहरु, सरदार पटेल, मौलाना आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस यांसारखे स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी आणि जनतेचे नेतृत्व करणाऱ्या व स्फूर्तिस्थान असलेल्या अन्य अनेक व्यक्ती या सर्वांच्या स्मृतीला आपण वंदन करूया. मातृभूमीला दास्यामध्ये जखडून ठेवणाऱ्या श्रृंखलांतून मुक्त करण्याच्या ऊर्मीनेच केवळ प्रेरित होऊन आणि स्वतःसाठी कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता स्वतःला स्वातंत्र्य संग्रामात झोकून देणाऱ्या, काही ज्ञात आणि कित्येक अज्ञात अशा अगणित स्त्री-पुरुषांना आपण आदरांजली अर्पण करूया.

स्वातंत्र्य लढ्याची मुहूर्तमेढ रोवण्यात आली त्या काळापासून महाराष्ट्र या लढ्यात आघाडीवर राहिला आहे, या गोष्टीचा आम्हाला अभिमान वाटतो. स्वातंत्र्याची ऊर्मी आणि न्याय व हक्कासाठी लढण्याची दुर्दम्य

इच्छा हा महाराष्ट्रीय जनतेला, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळेपासून लाभलेला समृद्ध वारसा आहे. जाज्वल्य देशाभिमान, अतुलनीय धैर्य, उदात्तता आणि शौर्य हे गुण शिवाजी महाराजांच्या ठायी एकवटलेले होते आणि महाराष्ट्रीय लोकांसाठीच नव्हे, तर संपूर्ण राष्ट्रासाठी ते स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानाचे प्रतीक बनले होते. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामान्य जनतेत सामाजिक न्याय, हक्क, स्वातंत्र्य, समता आणि आत्मसन्मान यांविषयीची जाणीव निर्माण केली. महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीचे थोर प्रणेते न्यायमूर्ती रानडे, दादाभाई नौरोजी, फिरोजशा मेहता , गोपाळकृष्ण गोखले, विनोबा भावे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नेतृत्व संपूर्ण राष्ट्राला स्फूर्तिदायी ठरले. निधड्या छातीच्या लोकमान्य टिळकांनी '' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे '' अशी अजरामर सिंहगर्जना करून सर्व जनतेला प्रेरित केले आणि त्यातून स्वातंत्र्य लढ्याला एक नवी दिशा आणि विचार मिळाला.

या पार्श्वभूमीवर, १८८५ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना करण्यासाठी आणि त्यानंतर १९४२ च्या ऑगस्टमध्ये चलेजाव चळवळीद्वारे स्वातंत्र्याच्या अंतिम लढ्याचा प्रारंभ करण्यासाठी या मुंबई शहराची निवड होणे स्वाभाविक होते. आता, सुवर्णमहोत्सवी समारंभाच्या राष्ट्रीय समितीने या समारंभाच्या शुभारंभाचा कार्यक्रम ९ ऑगस्ट रोजी या शहरात आयोजित करण्याची जबाबदारी आपल्याकडे सोपवून जणू काही, मुंबई शहराने स्वातंत्र्य लढ्यात बजावलेल्या नेतेपदाच्या कामगिरीचा ऋणनिर्देशच केला आहे, त्याबद्दल आम्हाला कृतज्ञता वाटते.

महाराष्ट्रातील प्रत्येक शहर, गाव आणि खेडे यांनी मुक्तिसंग्रामात केलेल्या योगदानाबद्दल आणि त्यांच्या सुपुत्रांनी व सुकन्यांनी केलेल्या बलिदानाबद्दल त्यांना वाटणारा अभिमान सार्थच आहे. महाराष्ट्रातील त्या वीरांना आम्ही अभिवादन करतो.

आजच्या दिवसाचे वैशिष्ट्य म्हणजे, आज आपण आपल्या स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहोत, त्याचबरोबर हा आपल्या लोकशाहीचाही

सुवर्णमहोत्सव आहे. परकीय सत्तेच्या गुलामीतून मुक्त होणे ही कोणत्याही राष्ट्राच्या दृष्टीने अभिमानाची व समाधानाची बाब आहे. परंतु हे स्वातंत्र्य लोकशाहीविना मिळाले असते तर आपल्याला त्यातून पुरेपूर समाधान लाभले नसते. गेली ५० वर्षे आपण असंख्य अडचणींना तोंड देत लोकशाहीच्या मूल्यांचे काटेकोर जतन करण्यात यशस्वी ठरलो आहोत, हे सत्य नजरेसमोर ठेवता, आपल्या जनतेच्या, लोकशाही मूल्यांविषयीच्या गाढ निष्ठेचा आपल्याला रास्त अभिमान वाटला पाहिजे.

घटना तयार करतेवेळी आपल्या प्रजासत्ताकाच्या आद्य संस्थापकांपुढे भारतात अध्यक्षीय पद्धतीचे सरकार असावे की संसदीय पद्धतीचे सरकार असावे हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता. आपल्यासारख्या विविधता आणि संमिश्रता यांनी नटलेल्या देशाकरिता संसदीय लोकशाही पद्धती अधिक योग्य ठरू शकेल आणि त्यात जनतेला आपल्या स्वतःच्या सरकारात सहभागी होण्यास अधिक वाव मिळेल अशा ठाम विश्वासाने भारताने तुलनेने कठीण असा हा लोकशाही पद्धतीचा पर्याय स्वीकारला. या पद्धतीमधील अडचणी व तोटे सोसूनही जनता ही पद्धती यशस्वी करुन दाखवील या भरवशाने आपल्या प्रजासत्ताकाच्या आद्य संस्थापकांनी मोठ्या विश्वासाने ही पद्धती अंगीकारली होती.

गेल्या ५० वर्षांमधील भारतातील लोकशाहीच्या वाटचालीचा मागोवा घेताना जाणवणारी समाधानाची बाब म्हणजे, या पद्धतीने आपल्या देशात मूळ धरले असून ती वर्धनक्षम व अनुरूप असल्याचे सिद्ध झाले आहे. ही पद्धती अंमलात आणताना आपल्याला ज्या त्रुटी आढळल्या त्या पाहता काही वेळा लोकांना नैराश्य येण्याची शक्यता आहे. परंतु, या पद्धतीचे यशापयश ठरविण्याच्या दृष्टीने ५० वर्षांचा काळ हा फारच थोडा काळ आहे हे आपण विसरता कामा नये. तसेच भारताला लोकशाहीची दीर्घ परंपरा नाही हेही आपण लक्षात घेतले पाहिजे.

दक्षिण अफ्रिकेतून परतल्यावर गांधीजींनी भारतीय राजकारणात प्रवेश केला आणि इंडियन नॅशनल काँग्रेसने सुरू केलेल्या स्वातंत्र्य चळवळीचे

जनआंदोलनात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी, सामान्य जनतेला आपल्या देशाच्या राज्यकारभारात प्रथमच स्वारस्य निर्माण झाले व ती त्यात सहभागी झाली. त्यावेळेपर्यन्त स्वातंत्र्याची चळवळ ही भारतातील मोठ्या शहरांमधील काही हितेच्छु बुद्धिमंतांनी आपल्या खास गुप्त बैठकींमध्ये तयार केलेले ठराव, निवेदने व विनंतीअर्ज इत्यादींपुरतीच मर्यादित होती. भारतातील आम जनतेचा आणि विशेषतः स्त्रियांचा देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष सहभाग नव्हता. गांधीजींनी स्वराज्याचा कानमंत्र खेड्यांतील शेतकऱ्यांपर्यन्त आणि कारखान्यांतील कामगारांपर्यन्त पोहोचवला आणि त्यानंतरच ही स्वातंत्र्याची चळवळ खऱ्या अर्थाने जनआंदोलन झाली. खरे म्हणजे, सामान्य भारतीयाला मिळालेला हा लोकशाहीचा पहिला धडा होता.

अद्यापही, प्रशासनामध्ये जनता अपेक्षेइतकी सहभागी झालेली नाही असे म्हणणे भाग पडते. संसदीय लोकशाही म्हणजे केवळ प्रातिनिधिक लोकशाही नव्हे तर ती जनतेचा सहभाग असणारी सहभागयुक्त लोकशाहीसुद्धा असली पाहिजे. अशा सहभागयुक्त लोकशाहीमध्ये निवडणुकीच्या वेळी मतदान करूनच केवळ लोकांची जबाबदारी व सहभाग संपत नाही. लोकशाही खरोखरच अर्थपूर्ण ठरायला पाहिजे असेल तर, लोकांचा हा सहभाग सातत्याने राहणे आवश्यक असते.

निर्वाचित लोकप्रतिनिधींना आणि मंत्र्यांना मतदारसंघातील रस्ते व कालवे, रुग्णालये व शाळा यांसंबंधीच्या लोकांच्या गरजांची माहिती देणे एवढेच लोकशाहीत अभिप्रेत नाही तर, लोकहिताचे शासकीय धोरण ठरवू शकेल असे जनमत तयार करणे हा याचा खरा अर्थ आहे. दुर्दैवाने, जनतेचा सहभाग असणारी लोकशाही आपल्या देशात अजूनही पक्की स्थिरावलेली नाही.

सामान्य लोकांमध्ये त्यांचे हक्क व कर्तव्ये यांबाबतच्या पुरेशा ज़ागरुकतेचा व जाणिवेचा अभाव हा आपल्या देशातील लोकशाहीचा आणखी एक कमकुवत पैलू आहे. जगातील अन्य कोणत्याही सुसंस्कृत

लोकशाहीने आपल्या नागरिकांना जे अधिकार दिलेले आहेत तेच अधिकार आपण अंगीकारलेल्या संविधानात समाविष्ट केलेले आहेत. तथापि, एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, शतकानुशतके आपला समाज हा, व्यक्ती-व्यक्तींमधील विषमता, स्वातंत्र्याचा आणि प्रतिष्ठेचा अभाव याचे ठळक उदाहरण ठरलेला आहे. केवळ विशिष्ट जातींमध्ये जन्म झाल्यामुळे समाजातील मोठ्या घटकाला समानता आणि हक्कांपासून वंचित रहावे लागले. स्वातंत्र्य मिळून नवीन घटना तयार होईपर्यन्त जातिभेद आणि त्याअनुषंगाने हक्क नाकारणे यातून निर्माण झालेल्या विषमतेच्या जाचक बंधनांत आपला समाज अडकून पडला होता. १८ व्या शतकातील फ्रेंच क्रांतीमुळे किंवा अमेरिकन क्रांतीमुळे पाश्चिमात्य जगाला '' स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव '' यासारख्या किंवा '' माणूस हा जन्मतः स्वतंत्र असतो आणि तो स्वातंत्र्याचा आणि समान हक्कांचा अधिकारी असतो '' या कल्पना परिचित झाल्या होत्या. मात्र आपल्याकडे त्या कल्पना तेवढ्या प्रभावीपणे रुजल्या नाहीत. उलटपक्षी, १८ वे शतक हे भारताच्या दृष्टीने लाजिरवाणे आणि मानहानीकारक शतकच ठरले. याच शतकाने प्लासी, बक्सर आणि पानिपतच्या लढायांमध्ये भारताची नामुष्की पाहिली आणि एका परकीय व्यापारी कंपनीने काही हजार सैनिकांच्या बळावर कोटींच्या घरातील लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाला गुलाम बनवलेलेही पाहिले. या गुलामगिरीच्या श्रृंखला तोडण्यासाठी आणि सर्व नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार आणि समता यांची घटनात्मक हमी देण्यासाठी भारतीय जनतेला दोन शतके वाट पहावी लागली.

परंतु, हक्क व अधिकारांचा घटनेत केवळ समावेश केल्याने लोकशाही यशस्वी ठरू शकणार नाही या मुद्द्यावर भर देणे महत्त्वाचे आहे. लोकांना त्यांचे हक्क आणि कर्तव्ये यांची जाणीव असायला हवी व ते त्याबाबत दक्ष व जागरुक असायला हवेत. यातूनच घटनेत जिवंतपणा येईल आणि लोकशाहीला अर्थ निर्माण होईल.

आपल्या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी प्रसंगाच्या निमित्ताने आपण पुन्हा एकदा एकसंध, बलवान आणि समृद्ध भारताच्या निर्माण कार्याला वाहून घेऊया आणि आपल्या लोकशाहीचे चैतन्यदायी आणि तेजस्वी उदाहरण जगापुढे ठेवूया.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

मुद्रणस्थळ : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई